मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी महापालिकेच्या अर्जाच्या रकान्यात आता तृतीयपंथीयांनाही स्थान!

## आवेदनपत्र लिंग या प्रकारासमोर स्त्री, पुरुष आणि तृतीयपंथी असे रकाने

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिकेच्या विविध सोई-सुविधा मिळण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या अर्जांच्या रकान्यामध्ये आता तृतीयपंथीयांनाही स्थान देण्यात आले आहे. महापालिकेच्या सर्व अर्ज, आवेदनपत्रांवर लिंग या प्रकारासमोर स्त्री, पुरुष आणि तृतीयपंथी असे तीन रकाने उपलब्ध असणार आहेत. तृतीयपंथी व्यक्तींना महापालिकेच्या विविध सोई-सुविधा देताना तसेच, लाभ देताना कागदोपत्री अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. महापालिकेतर्फे



स्वीकारले जाणारे किंवा मागविले जाणारे अर्ज व आवेदनपत्र भरताना त्यावर लिंग या रकान्यासमोर स्त्री आणि पुरुष असे दोनच पर्याय असतात. तेथे तृतीयपंथी असा पर्याय उपलब्ध नसल्याने ते सोई-सुविधांपासून वंचित राहतात.

तृतीयपंथी हा समाजाचा घटक आहे. त्यांनाही सन्मानाने जगण्याचा आणि महापालिकेच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचा मूलमूत अधिकार आहे. त्यामुळे महापालिकेच्या सर्व विभागांकडून अर्ज मागविताना त्या अर्जावर स्त्री, पुरुष तसेच, तृतीयपंथी असा रकाना उपलब्ध करून द्यावा, असे आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी सर्व विभागप्रमुखांना दिले आहेत.

यापुढे महापालिकेच्या सर्व अर्ज व आवेदनपत्रांवर लिंग या प्रकारासमोर स्त्री, पुरुष व तृतीयपंथी असे तीन पर्यायी रकाने उपलब्ध असणार आहेत. महापालिकेने वारसा हक्कानुसार अनुकंपा तत्वावर सफाई कामगार म्हणून एका तृतीयपंथीयास कायमस्वरूपी नोकरी दिली आहे. तर सुरक्षा, उद्यान विभागात कंत्राटी पद्धतीने सुरक्षारक्षक म्हणून नेमले आहेत.

### तृतीयपंथी हा समाजाचा घटक

» **तृतीयपंथी हा समाजाचा घटक आहे. त्यांनाही सन्मानाने जगण्याचा आणि महापालिकेच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचा मूलमूत अधिकार आहे. त्यामुळे महापालिकेच्या सर्व विभागांकडून अर्ज मागविताना त्या अर्जावर स्त्री, पुरुष तसेच, तृतीयपंथी असा रकाना उपलब्ध करून द्यावा, असे आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी सर्व विभागप्रमुखांना दिले आहेत. यापुढे महापालिकेच्या सर्व अर्ज व आवेदनपत्रांवर लिंग या प्रकारासमोर स्त्री, पुरुष व तृतीयपंथी असे तीन पर्यायी रकाने उपलब्ध असणार आहेत.**

# प्रसाद सस्ते यांची महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी निवड

## महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या नियंत्रणाखाली भोसरीत स्पर्धा

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या मान्यतेने धाराशिव येथे ६५ वी महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा पार पडणार आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद यांच्या निरीक्षणखाली पिंपरी-चिंचवड येथे त्यासाठी निवड चाचणी कुस्ती स्पर्धा घेण्यात आली. पै. बाळासाहेब रामचंद्र लांडगे (वस्ताद) यांच्या ६९ वा वाढदिवसानिमित्ताने या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत ८१ खेळाडूंनी सहभाग घेतला. या मध्ये प्रसाद सस्ते हा महा केसरीचे मानकरी ठरला. पै.



नितिन बाळासाहेब लांडगे, महेशदादा स्पोर्टस फाऊंडेशन, भवानी तालीमच्या वतीने याचे संयोजन करण्यात आले. पैलवान मारुती रावजी लांडगे आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुल भोसरी येथे या स्पर्धा पार पडल्या. पैलवान किसन शंकर लांडगे यांच्या हस्ते उदघाटन झाले. आमदार महेश किसन लांडगे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

यावेळी माजी नगरसेवक लक्ष्मण सस्ते, सागर गवळी, संतोष लोंढे, नंदकुमार लांडे, दत्ता गव्हाणे, दामोदर फुगे, मदन गव्हाणे, गणपत गव्हाणे, रंगनाथ फुगे, शिवाजी गव्हाणे, भगवान लोंढे, राजाराम फुगे, महाराज सोपान फुगे, बाळासाहेब गवळी, राजेंद्र लांडगे, विजय लांडगे,' मारुती लांडगे, शिवाजी लांडगे, ' पै. विनय लांडगे, पै. बाबा तांबे, माऊली कुटे', पंडित मोकाशी-बोराडे, बबन बोऱ्हाडे, योगेश लांडगे, तुळशिराम लोंढे, सुरेश लोंढे, हिरामण लांडगे, अनिल फूगे, सतीश गावडे, अनिल लोंढे, पप्पु काळभोर, ज्योती बारणे, भाऊसाहेब लांडे, कैलास माने, देवा माने, रतन लांडगे, लाला लांडगे, अंकुश लोंढे, किशोर नखाते आदींसह भोसरीतील ग्रामस्थ उपस्थित होते. नितिन लांडगे, नारायण लांडगे, विष्णु लांडगे, अजय लांडगे, स्वप्नील लांडगे, गणेश लांडगे, संतोष लांडगे महाराज, कालिदास लांडगे, राहुल गवळी, रूपेश जाधव आदींनी या निवड चाचणी स्पर्धेचे संयोजन केले. चंद्रकांत मोहोळ, रोहिदास आमले, निलेश मारणे यांनी पंच म्हणून काम पाहिले. महाराष्ट्र चॅम्पियन पुणे पोलीस पैलवान स्वप्नील लांडगे यांनी सर्व कुस्तीपटू व वस्ताद यांचे आभार मानले.

# विद्यापीठात राड्यानंतर आता सलोखा!

## पोलीस आयुक्तांच्या उपस्थितीत विद्यार्थी संघटनांमध्ये होणार समेट

**पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** गेल्या काही दिवसांत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यार्थी संघटना, राजकीय पक्ष यांच्यातील वादांच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर सलोख्याचे वातावरण निर्माण करण्यासाठी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठाने पोलीस आयुक्त, कुलगुरूंच्या उपस्थितीत येत्या शनिवारी विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी यांच्या संघटनासोबत चर्चा करून सर्वंकष उपाययोजना करण्यासाठी पाऊल उचलले जाणार आहे. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली. विद्यापीठात काही दिवसांपूर्वी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडिया या दोन संघटनांच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार हाणामारी झाली होती. या प्रकरणी दोन्ही संघटनांकडून पोलिसांकडून तक्रारी दाखल केल्यानंतर गुन्हा दाखल झाला. त्यानंतर विद्यापीठाच्या वसतीगृहातील भिंतीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी वादग्रस्त मजकूर लिहिल्याची तक्रार अभाविपने केली. त्यानंतर भाजपने निषेध मोर्चा काढल्यानंतर भाजप कार्यकर्ते आणि अन्य एका संघटनेच्या कार्यकर्त्यांमध्ये वादावादी झाली होती. त्यामुळे विद्यापीठात तणावाचे वातावरण निर्माण झाले. त्यामुळे पुणे पोलिसांनी ७ ते २१ नोव्हेंबर या कालावधीत विद्यापीठात जमावबंदी लागू केली आहे. विद्यापीठ आवारात शैक्षणिक पावित्र्य राखणे, वैचारिक स्वातंत्र्यासोबत सलोख्याचे वातावरण जपणे ही समाजाच्या सर्व घटकांची जबाबदारी आहे. विद्यापीठाशी संबंधित सर्व विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी यांच्या संघटनांसोबत चर्चा करून सर्वंकष उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी शनिवारी सकाळी अकरा वाजता विद्यापीठाच्या मुख्य इमारतीतील ज्ञानेश्वर सभागृहात विद्यार्थी प्रतिनिधींची कुलगुरू, पोलीस आयुक्तांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली आहे. संघटनेच्या कमाल तीन ते पाच प्रतिनिधींना बैठकीस उपस्थित राहता येणार आहे.




### दोन्ही संघटनांकडून तक्रारी

**» या प्रकरणी दोन्ही संघटनांकडून पोलिसांकडून तक्रारी दाखल केल्यानंतर गुन्हा दाखल झाला. त्यानंतर विद्यापीठाच्या वसतीगृहातील भिंतीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी वादग्रस्त मजकूर लिहिल्याची तक्रार अभाविपने केली. त्यानंतर भाजपने निषेध मोर्चा काढल्यानंतर भाजप कार्यकर्ते आणि अन्य एका संघटनेच्या कार्यकर्त्यांमध्ये वादावादी झाली होती. त्यामुळे विद्यापीठात तणावाचे वातावरण निर्माण झाले. त्यामुळे पुणे पोलिसांनी ७ ते २१ नोव्हेंबर या कालावधीत विद्यापीठात जमावबंदी लागू केली आहे.**

# पुण्यात आढळला झिकाचा पहिला रुग्ण

## आरोग्य विभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू केल्या

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** शहरात झिका आजाराचा यंदा पहिला रुग्ण आढळला आहे. हा रुग्ण येरवड्यातील प्रतीकनगरमध्ये सापडला असून आरोग्य विभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू केल्या आहेत. झिकाचा संसर्ग झालेली ६४ वर्षांची महिला आहे. काही दिवसांपूर्वी पिंपरी- चिंचवडमध्ये एक सांस्कृतिक कार्यक्रम झाला होता. त्याला या महिलेने हजेरी लावली होती. त्यानंतर तिला ताप आला आणि अंगदुखीचा त्रास होऊ लागला. तिला पुण्यातील खासगी रुणालयात दाखल करण्यात आले. तिच्या तपासणीत अखेर झिकाचे निदान झाले. दरम्यान, पिंपरी-चिंचवडमधील सांस्कृतिक कार्यक्रमाला केरळमधील अनेक जण उपस्थित होते. त्यातील एखाद्या बाधित व्यक्तीकडून या महिलेला संसर्ग झाला असू शकतो, असे आरोग्य विभागातील सूत्रांनी सांगितले.या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाचे सहसंचालक डॉ. प्रतापसिंह सारणीकर यांनी झिका रुग्ण आढळून आलेल्या ठिकाणी प्रतिक नगर येरवडा येथे प्रत्यक्ष रुग्णाची भेट घेतली. रुग्णाची विचारपूस करून तब्येतीची काळजी घेण्यास सांगण्यात आले. त्याचप्रमाणे पुणे महापालिकेच्या कर्मचा-यांना झिका रुग्ण आढळून आलेल्या ठिकाणी योग्य त्या प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्याचे आदेश देण्यात आले.



> **येरवड्यात झिकाचा रुग्ण आढळला आहे. रुग्णाच्या कुटुंबातील इतर सदस्यांना कोणतीही लक्षणे आढळून आलेली नाहीत. तरीही खबरदारी म्हणून रुग्णाच्या कुटुंबातील पाच सदस्यांचे नमुने तपासणीसाठी राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेकडे पाठविण्यात आले आहेत.**
>
> **-डॉ. प्रतापसिंह सारणीकर, सहसंचालक, आरोग्य विभाग**

# रुपाली चाकणकरांनी केली भाऊबीज साजरी

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** देशभरात भाऊबीज हा सण मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात येत असून पुण्यातील भोई प्रतिष्ठानच्या वतीने गंज पेठेतील अग्निशामक विभागाच्या मुख्य कार्यालयात भाऊबीज कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला भाजपचे नेते मंत्री चंद्रकांत पाटील,महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर,आमदार रवींद्र धंगेकर, आयोजक मिलिंद भोई यांच्यासह विविध क्षेत्रातील मंडळी उपस्थित होते.तर यावेळी महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी भाजपचे नेते मंत्री चंद्रकांत पाटील आणि आमदार रवींद्र धंगेकर यांना ओवाळून भाऊबीज साजरी करीत दोन्ही नेत्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी रुपाली चाकणकर म्हणाल्या की, मागील १६ वर्षापासून अग्निशामक विभागाच्या भाऊबीज कार्यक्रमाला येते. त्या निमित्ताने सर्वांसोबत संवाद साधणे शक्य होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सार्वजनिक जीवनात काम करण्यास एक ऊर्जा मिळते अशी भावना यावेळी त्यांनी व्यक्त केली. तसेच त्या पुढे म्हणाल्या की, आज या कार्यक्रमा दरम्यान भाजपचे नेते मंत्री चंद्रकांत पाटील आणि आमदार रवींद्र धंगेकर यांना ओवाळले आहे. पण माझे बंधू जयंत पाटील यांना डेंग्यू झाला असून ते आजारी आहेत. ते लवकर बरे होतील, तसेच मला जयंत पाटील यांनी फोन करून भाऊबीज सणाच्या शुभेच्छा दिल्या असल्याचं त्यांनी सांगितले.

# पालिकेची संबंधित न्यायालयात दावे किती?

## पुणे महापालिकेच्या विधी विभागाकडेच माहिती नाही?

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिकेशी संबंधित सर्व न्यायालयीन दाव्यांची स्थिती दर्शविणारा एकत्रित अहवाल दरमहा पाच तारखेपूर्वी सादर करण्याच्या आयुक्तांच्या आदेशाची विधी विभागाने पायमल्ली केल्याचे स्पष्ट झाले आहे. गेल्या नऊ वर्षांत विधी विभागाने एकही अहवाल सादर केलेला नसल्याने विधी विभाग प्रमुखांना निलंबित करावे, अशी मागणी शहरातील स्वयंसेवी संस्थांनी केली आहे.

महापालिकेशी संबंधित सर्व न्यायालयीन दाव्यांची माहिती व्हावी आणि त्याचा जलदगतीने निपटारा व्हावा, यासाठी तत्कालीन महापालिका आयुक्त कुणाल कुमार यांनी सर्व न्यायालयीन दाव्यांची स्थिती दर्शविणारा एकत्रित अहवाल प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपूर्वी अतिरिक्त आयुक्तांच्या मार्फत विधी विभागाने द्यावा, असा निर्णय घेतला होता.



### विधी विभागानेच दिलेल्या माहितीतून ही बाब पुढे आली

» यासंदर्भात सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी किती अहवाल विधी विभागाने दिले, याची माहिती मागितली होती. त्यावेळी नऊ वर्षांत एकही अहवाल सादर करण्यात आला नसल्याचे पुढे आले होते. त्यासंदर्भात वेलणकर यांनी आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांच्याकडे फेब्रुवारी महिन्यात तक्रार केली होती. या तक्रारीनंतर विधी विभागाकडून प्रत्येक महिन्याला अहवाल दिला जाईल, असे वाटत होते. मात्र तक्रारीनंतर एकही मासिक अहवाल विधी विभागाने दिलेला नाही. विधी विभागानेच दिलेल्या माहितीतून ही बाब पुढे आली आहे, असे वेलणकर यांनी सांगितले.


त्याबाबतचे कार्यालयीन आदेशही त्यांनी काढले होते. यासंदर्भात सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी किती अहवाल विधी विभागाने दिले, याची माहिती मागितली होती. त्यावेळी नऊ वर्षांत एकही अहवाल सादर करण्यात आला नसल्याचे पुढे आले होते. त्यासंदर्भात वेलणकर यांनी आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांच्याकडे फेब्रुवारी महिन्यात तक्रार केली होती. या तक्रारीनंतर विधी विभागाकडून प्रत्येक महिन्याला अहवाल दिला जाईल, असे वाटत होते. मात्र तक्रारीनंतर एकही मासिक अहवाल विधी विभागाने दिलेला नाही. विधी विभागानेच दिलेल्या माहितीतून ही बाब पुढे आली आहे, असे वेलणकर यांनी सांगितले.

एकही मासिक अहवाल विधी विभागाने सादर केलेला नाही. त्यामुळे विधी विभाग प्रमुखांना आयुक्तांपर्यंत वस्तुस्थिती पोहोचू द्यायची नसल्याने ते जाणीवपूर्वक आदेशांचे उल्लंघन करत आहेत. त्यामुळे विधी विभाग प्रमुखांना निलंबित करून त्यांची चौकशी करावी, अशी मागणी वेलणकर यांनी आयुक्तांकडे केली आहे.

# मिळकतकरातील ४० टक्के सवलत योजनेला मुदतवाढ

## निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** मिळकतकरातील ४० टक्क्यांची सवलत घेण्यासाठीच्या योजनेला मुदतवाढ देण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. योजनेची मुदत १५ नोव्हेंबर रोजी संपणार असल्याने ३० नोव्हेंबर पर्यंतची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्याबाबतचे आदेश येत्या गुरुवारी काढण्यात येणार आहेत. शहरातील निवासी मिळकतींना वर्षानुवर्षे मिळणारी ४० टक्क्यांची सवलत १ एप्रिल २०२३ पासून रद्द करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला होता. त्याचे तीव्र पडसाद शहरात उमटले होते. त्यामुळे ही सवलत कायम ठेवावी, असा प्रस्ताव




### राज्य शासनाला पाठविण्यात आला होता प्रस्ताव

» शहरातील निवासी मिळकतींना वर्षानुवर्षे मिळणारी ४० टक्क्यांची सवलत १ एप्रिल २०२३ पासून रद्द करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला होता. त्याचे तीव्र पडसाद शहरात उमटले होते. त्यामुळे ही सवलत कायम ठेवावी, असा प्रस्ताव महापालिकेने राज्य शासनाला पाठविण्यात आला होता. त्याला मंत्रिमंडळाने आणि त्यानंतर विधानसभेच्या अधिवेशनातही मंजुरी मिळाली होती.

महापालिकेने राज्य शासनाला पाठविण्यात आला होता. त्याला मंत्रिमंडळाने आणि त्यानंतर विधानसभेच्या अधिवेशनातही मंजुरी मिळाली होती. सवलत कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात काहीसा विलंब झाल्याने यंदा मिळकतकराची नियमित देयके देण्यासही उशीर झाला होता.

> “मिळकतकरातील ४० टक्क्यांची सवलत कायम करण्यासाठी महापालिकेकडून अर्ज मागविण्यात आले होते. ही मुदत १५ नोव्हेंबर रोजी संपणार असल्याने मुदतवाढ देण्यात आली आहे. मिळकतधारकांना ३० नोव्हेंबर पर्यंत सवलतीसाठी अर्ज करता येणार आहे. त्याबाबतचे आदेश आयुक्त विक्रम कुमार यांच्याकडून काढण्यात येतील.
>
> -अजित देशमुख, उपायुक्त, कर आकारणी आणि कर संकलन विभाग, पुणे महापालिका

तसेच ज्या तीन लाखांहून अधिक मिळकतधारकांची ही सवलत रद्द करण्यात आली आहे, त्यांनी क्षेत्रीय कार्यालयाकडे अर्ज करावा, असे प्रशासनाकडून जाहीर करण्यात आले होते. त्यासाठी १५ नोव्हेंबर ही अंतिम मुदत देण्यात आली होती. मात्र या कालावधीत ७० हजार मिळकतधारकांनी महापालिकेकडे अर्ज केले होते. मिळकतधारकांची उदासीनता आणि दिवाळीची सुटी यामुळे मिळकतकर सवलत योजनेला मुदतवाढ द्यावी, अशी मागणी स्वयंसेवी संस्था, माजी नगरसेवकांनी केली होती. त्यानुसार पंधरा दिवसांनी मुदत वाढविण्यात आली आहे.

# खडकवासला धरण ते फुरसुंगी कालवा होणार बंद

## खडकवासला धरण ते फुरसुंगी बोगद्यातून पाणी नेण्याची योजना



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** खडकवासला धरण ते फुरसुंगी दरम्यान बोगद्यातून पाणी नेण्याचे प्रस्तावित असून त्यामुळे उपलब्ध होणाऱ्या जागेचा वापर कोणत्या कारणासाठी करता येईल, याचे सर्वे क्षण महापालिकेकडून सुरू करण्यात आले आहे. या जागेचा वापर नगररचना योजना किंवा व्यावसायिक कारणासाठी करण्याचे नियोजित आहे.

खडकवासला धरण ते फुरसुंगी या दरम्यान बोगद्यातून पाणी नेण्याची योजना हाती घेण्यात आली आहे. त्याचा सविस्तर प्रकल्प आराखडाही तयार करण्यात आला असून त्याला राज्याच्या तांत्रिक सल्लागार समितीनेही मान्यता दिली आहे. अद्याप राज्य शासनाकडून या प्रस्तावाला मान्यता देण्यात आलेली नाही. ही योजना दीड हजार कोटी रुपयांची असून बोगद्यामुळे अडीच अब्ज घनफूट पाण्याची बचत होणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या जागेचा वापर करण्याची सूचना महापालिकेला केली होती. योजनेचे काम पूर्ण होण्यास तीन वर्षांचा कालावधी लागणार आहे. त्यानंतर उपलब्ध जागेचा वापर व्यावसायिक कारणांसाठी वापर करता येणे शक्य आहे. त

यानुसार उड्डाणपूल, मेट्रोचा पर्यायाचा विचारही सुरू झाला आहे. ही जागा ५०० मीटर ते एक किलोमीटर इतक्या रुंदीची आहे. त्यातील काही भाग महापालिका, पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांच्या हद्दीत येत आहे. योजना पूर्ण झाल्यानंतर जागा महापालिकेकडे हस्तांतरित होणार असून जागेचा वापर करून निधी उभारण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेकडून सर्वे क्षण सुरू करण्यात आले आहे.

योजनेमुळे कालव्याची जी जागा उपलब्ध होणार आहे तिचा वापर कसा करता येईल याचे सर्वे क्षण सल्लागार कंपनीच्या माध्यमातून सुरू केले आहे. येत्या दहा ते पंधरा दिवसांत अहवाल महापालिकेला मिळेल. त्यानंतर योग्य निर्णय घेण्यात येईल, असे महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी सांगितले.

# धूळ नियंत्रणासाठी पुणे महापालिकेचा महत्वपूर्ण निर्णय

## अति रहदारीच्या चौकात उभारणार कारंजे

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शहरातील प्रदूषणात वाढ झाल्याने ते नियंत्रणात ठेवण्यासाठी महापालिकेकडून उपाययोजनांना सुरुवात झाली आहे. त्याअंतर्गत अति रहदारीच्या ठिकाणी कारंजे उभारण्याचे नियोजित असून पहिल्या टप्प्यात २० ठिकाणी कारंजे उभारण्यात येणार आहेत. कारंज्यांमुळे धूळ नियंत्रणात राहील, असा दावा महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे. पुणे, मुंबईसह राज्यातील अनेक शहरांमधील प्रदूषणाची पातळी वाढली असून, नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयानेही हवेच्या ढासळत्या गुणवत्तेबाबत चिंता व्यक्त करताना तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश महापालिकांना दिले आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार महापालिका प्रशासनाकडूनही उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. शहरातील वायू प्रदूषण नियंत्रणात आहे. अन्य शहरांच्या तुलनेत हवेची गुणवत्ता चिंताजनक पातळीवर पोहोचलेली नाही. मात्र, दक्षतेचा उपाय




म्हणून शहरातील २० ठिकाणी कारंजे बसविण्याचे नियोजित आहे. संचेती चौक, जंगली महाराज रस्ता, येरवडा चौक, लोकमान्य टिळक चौक, शनिवारवाडा चौक आणि स्वारगेट चौक या प्रमुख चौकांचा यामध्ये समावेश असून, हे सर्व चौक अति रहदारीचे आहेत. यामुळे धुलिकण जमिनीवर स्थिर होण्यास मदत होणार आहे, असा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. रहदारीच्या चौकांचा अभ्यास करून हा निर्णय घेण्यात आला आहे.

दरम्यान, शहरातील प्रदूषण नियंत्रणात ठेवण्यासाठी नैसर्गिक इंधनावरील (सीएनजी) आणि वीजेवर धावणारी वाहने खरेदीचे धोरण महापालिकेने स्वीकारले आहे. त्यादृष्टीने महापालिकेच्या अधिकारी वर्गासाठीही वीजेवर धावणाऱ्या गाड्यांची खरेदी करण्यात आली आहे. तर रिक्षांचे सीएनजीमध्ये रूपांतर करण्यासाठी महापालिकेकडून प्रोत्साहन निधी दिला जात आहे.